# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १५७-२३** **दिनांक :- १६/०५/२०२३**

## सुमारे १५ वर्षापासुन ०३ दरोडा व ०२ मोक्का गुन्हयातील पाहिजे अरोपीतास अटक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांची कामगिरी.

---

दिनांक २१/०८/२००८ रोजी २१.३० वा. चे सुमारा काशिदकोपर फाटा, मांडवी, विरार या ठिकाणी राहणाऱ्या सौ. रेखा काशिनाथ चौधरी, वय ४५ वर्षे हे राहत्या घरात झोपले असतांना अरोपीत टेचर बंडया काळे व त्याचे साथीदारांनी आपसात संगणमत करुन हातात लोखंडी सळया घेवून फिर्यादी यांचे बंद दरवाज्यावर लाथा मारुन दरवाजाचा कडी व कोंयडा तोडून घरात प्रवेश करुन फिर्यादी व त्यांचे पती यांना लोखंडी सळयाने मारहाण करुन त्यांचे अंगावरील १७,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने खेचून घेवून पळून गेले होते. सदरबाबत विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं.२१०/२००८, भा. दं. वि. सं. कलम ३९५, ३९७, ४५२, ३४२, सह मोक्का कायदा कलम ३ (१) (दोन), ३ (२), ३ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे टेचर बंडया काळे, रा. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा हा गुन्हा केलेपासुन मिळुन येत नव्हता. गुन्हयातील पाहिजे आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याबाबत वरिष्ठानी मार्गदर्शन व आदेशीत केले होते.

नमुद पाहिजे आरोपी टेचर बंडया काळे व त्याचे साथीदारांनी यांनी आपसात संगनमत करुन एकुण ३ दरोडयाचे गुन्हे विरार पोलीस ठाणे हददीत करुन पळुन गेले होते व ते अदयापर्यंत मिळून आले नव्हते. दरोडयासारख्या गंभीर गुन्हयातील आरोपी अदयाप मिळून येत नसल्याने पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. अविनाश अंबुरे यांनी जास्तीत जास्त गुन्हयातील पाहिजे आरोपीत यांचा शोध घेवुन अटक करण्याबाबत सुचना व मागदर्शन केले होते.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे शाखेने वर नमुद पाहिजे आरोपीबाबत गुप्त बातमीदारमार्फत तसेच तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी हा सातारा जिल्हयात असल्याबाबत माहिती प्राप्त केली. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार हे सातारा येथे जावून वर नमुद गुन्हयातील आरोपीत नामे टेचर बंडया काळे, रा. मु. पो. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा येथून ताब्यात घेवून त्यास पुढील कारवाई कामी विरार पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

**नमुद आरोपी हा खालील गुन्हयात पाहिजे आरोपी आहे.**

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>आरोपीचे नांव</th><th>विरार पोलीस ठाणे गु.रजि.नंबर</th><th>भा.द.वि.सं.कलम</th></tr>
<tr><td rowspan="5">१.</td><td rowspan="5">टेचर बंडया काळे, रा. ललगुन, ता. पुसेगांव, जि. सातारा</td><td>१. २१०/२००८</td><td rowspan="5">३९५, ३९७, ४५२, ३४२, सह मोक्का कलम ३(१)(दोन),३(२),३(४),३(५)</td></tr>
<tr><td>२. १८४/२००८</td></tr>
<tr><td>३. १३४/२००८</td></tr>
<tr><td>४. स्पेशल केस नं ०३/२००९</td></tr>
<tr><td>५. स्पेशल केस नं ११/२०१२</td></tr>
</table>

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीरकण शाखेचे पो. नि. श्री. राहुल राख, पो.हवा.मनोहर तावरे, संग्राम गायकवाड, राजवीर संधु, प्रविण पवार, अनिल नांगरे, महेश वेल्हे, हनुमंत सुर्यवंशी तसेच स.फौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर शाखा यांनी केली आहे.

---------०००--------